पुण्याचाचि काय अभिमान । पापाचा का नाहीं अभिमान ॥
प्रताप दोहींचा समसमान । म्हणूनि निरभिमान वर्ते तूं ॥ १७८ ॥

तुला माझी घडावी भेटी । ऐसें जें आलें माझिया पोटीं ॥
तेव्हांच नारळ तुझिया करसंपुटीं । पडला ही गोष्टी त्रिसत्य ॥१७९॥

तुम्ही तरी माझीच ‿लें । फळ जें तुम्हां मुखीं लागलें ॥
तेंच तुम्हीं मज अर्पण केलें । समजा मज पावले निश्चित ॥ १८० ॥

ऐसी जेव्हां झाली समजूत । तेव्हांच पुंडलिकरावाचें चित्त ॥
साईमुखीच्या वचनें विरमत । उद्विग्नता वितळत हळू हळू ॥ १८१ ॥

नारळ गेला झालें निमित्त । उपदेशें निवळे उद्विग्न चित्त ॥
एवं ते सर्व अहंकार विलसित । अभिमान निर्मुक्त निर्दोष ॥ १८२ ॥

येवढेच या कथेचें सार । वृत्ती जों जों निरहंकार ॥
तों तों परमार्थी लाहे अधिकार । सहज भवपार होईल ॥ १८३ ॥

आतां तिसऱ्या भक्ताचा अभिनव । श्रवण करा गोड अनुभव ॥
दिसेल बाबांचें अतुल वैभव । सामर्थ्य गौरव एकसरें ॥ १८४ ॥

वांद्रे नाम तालुक्यामाझारीं । उत्तरेस वांद्रें शहराशेजारीं ॥
शांताक्रूस नामक नगरीं । वसत धुरंधर हरिभक्त ॥ १८५ ॥

सकल बंधु संतप्रेमी । निष्ठा जयांची दृढतर रामीं ॥
अनन्य श्रद्धा रामनामीं । नावडे रिकामी उठाठेव ॥ १८६ ॥

साधी तयांची संसारसरणी । तैसी मुलाबाळांची राहणी ॥
स्त्रीवर्गही निर्दोष आचरणी । ऋणी चक्रपाणी तेणें तया ॥ १८७ ॥

बाळाराम त्यांतील एक । विठ्ठलभक्त पुण्यश्लोक ॥
राजदरबारीं ज्यांचा लौकिक । आवडता देख सर्वत्रां ॥ १८८ ॥

तारीख एकोणीस फेब्रुवारी । सन अठरासें अठ्याहत्तरीं ॥
एका रामभक्ताचि ये उदरीं । उपजलें महीवरी हें रत्न ॥ १८९ ॥

अलंकार पाठारे प्रभू ज्ञातींत । प्रसिद्ध घरंदाज घराण्यांत ॥
सन अठरासें अठ्यात्तरांत । आले हे मुंबईंत जन्मास ॥ १९० ॥

पाश्चात्य विद्या पारंगत । ॲड्व्होकेट पदवी भूषित ॥
तत्वज्ञाना माजी निष्णात । विद्वान विख्यात सर्वत्र ॥ १९१ ॥

पांडुरंगीं अतिप्रेम । परमार्थाची आवड परम ॥
पितयाचें आराध्यदैवत राम । पुत्राचें निजधाम विठ्ठल ॥ १९२ ॥

अवघे बंधू पदवीधर । वृत्ती सदैव धर्मपर ॥
शुद्ध बीजाचे शुद्ध संस्कार । बाळारामावर अपूर्व ॥ १९३ ॥

कोटिक्रमाची मोहक मांडणी । सरळ शुद्ध विचारसरणी ॥
कुशाग्र बुद्धी सदाचरणी । गुण हे अनुकरणीय तयांचे ॥१९४ ॥

समाजसेवा केली नितांत । स्वयें लिहिला समाज वृत्तांत ॥
संपतां हें व्रत अंगीकृत । निघाले परमार्थ साधाया ॥ १९५ ॥

त्यांतही आक्रमुनी बराच प्रांत । भगवद्गीता ज्ञानेश्वरी ग्रंथ ॥
वाचूनि संपादिलें प्राविण्य त्यांत । अध्यात्म विषयांत नावाजले॥१९६॥

ते साईचे परम भक्त । सन एकोणीसशें पंचविसांत ॥
ब्रह्मीभूत अल्पवयांत । अल्प तच्चरित परिसावें ॥ १९७ ॥

तारीख नऊ माहे जून । एकोणीसशें पंचवीस सन ॥
इहलोकीं यात्रा संपवून । विठ्ठलीं विलीन हे झाले ॥ १९८ ॥

एमीक एकोणीसशें बारा । साली पाहूनि दिन एक बरा ॥
संतदर्शना साई दरबारा । बंधु धुरंधरा योग आला ॥ १९९ ॥

शिर्डीस बाबुलजी ज्येष्ठ सहोदर । घेऊनि वामनराव बरोबर ॥
दर्शन घेऊन सहा महिन्या अगोदर । आनंदानें परतल ॥ २०० ॥
तयांचा तो गोड अनुभव । अनुभवाया इतर सर्व ॥
दर्शनलाभ जोडाया अभिनव । बाळारामादि तव गेले ॥ २०१ ॥
हे येण्याचे आधींच देख । 'आज माझे दरबारचे लोक ॥
युणार आहेत येथे अनेक' । बाबा अवघ्यां देखत बोलले ॥ २०२ ॥
परिसून ऐसी प्रेमाची वार्ता । धुरंधर बंधूस अति विस्मयता ॥
शिर्डीस येण्याचे कोणा न कळवितां । बाबांस ही वार्ता कळली कसी ॥
पुढें साई पाहोनि दृष्टीं । धावोनि चरणीं घातली मिठी ॥
हळूहळू चालल्या गोष्टी । सुखसंतुष्टी सर्वत्रां ॥ २०४ ॥
शिवाय पाहूनि मंडळी आलीं । निघाली बाबांची वचनावळी ॥
'पहा हीं दरबारचीं माणसें आलीं'। येणार म्यां म्हटलीं होतीं तीं ॥२०५॥
आणीक पहे भाषा बाबांची । शब्देंशब्द ऐका ती साची ॥
" तुमची आमची साठ पिढ्यांची । ओळख पूर्वीची आहे बरें ॥२०६॥
बाळारामादि बंधुजन । सकळही ते विनयसंपन्न ॥
उभे सन्मुख कर जोडून । राहिले श्रीचरण लक्षीत ॥ २०७ ॥
श्रीसाईचें दर्शन होतां । बाळारामादि सर्वांचे चित्ता ॥
सोल्लास अनिवार प्रेमावस्था । आल्याची सार्थकता वाटली ॥ २०८ ॥
अश्रुपूर्ण झाले नयन । कंठ रोधिला बाष्पें करून ॥
रोमांच उठले सर्वांगावरून । आले दाटून अष्टभाव ॥ २०९ ॥
पाहोनि बाळारामाची अवस्था । उल्लास साईनाथाचे चित्ता ॥
बोलूं लागले तयां समस्तां । उपदेशवार्ता प्रेमाच्या ॥ २१० ॥

शुक्लपक्षाचिया चढत्या कला । तेणें परी भजे जो मजला ॥
धन्य जेणें मनोधर्म अपुला । निःशेष विकला मदर्थ ॥ २११ ॥

दृढ विश्वास धरोनि मनीं । प्रवर्ते जो निजगुरु भजनीं ॥
तयाचा ईश्वर सर्वस्वें ऋणी । पाही न कोणी वक्र तया ॥ २१२ ॥

वाया न दवडितां अर्धघडी । जयासीं हरिगुरु भजनीं आवडी ॥
तया ते देतील सुख निर्वडी । भव पैलथडीं उतरतील ॥ २१३ ॥

परिसोनियां ऐसें वचन । सर्वांनेत्रीं आनंदजीवन ॥
चित्त झालें सुप्रसन्न । अंतःकरण सद्गदित ॥ २१४ ॥

साईवाक्य सुमनमाळा । अवघीं वंदोनि घातलीं गळां ॥
तेणें आनंद झाला सकळां । कारण उमाळा भक्तीचा ॥ २१५ ॥

असो हे पुढें वाड्यांत आले । भोजनोत्तर थोडे विसावले ॥
तिसरे प्रहरीं पुनश्च गेले । लोटांगणीं आले बाबांस ॥ २१६ ॥

बाळाराम विनयसंपन्न । करूं लागले पादसंवाहन ॥
बाबांनीं चिलीम पुढें करून । ओढावयास खूण केली ॥२१७॥
मग ती चिलीम प्रसाद म्हणून । संवयी नसतां कष्टें ओढून ॥
पुन्हा बाबांचे हातीं देऊन । केलें अभिवंदन सद्भावें ॥ २१८ ॥
बाळारामास भाग्याचा दिन । लाभला पहा तैं पासून ॥
त्यांची दम्याची व्यथा जाऊन । पूर्ण समाधान जाहलें ॥ २१९ ॥
दमा ना एका दों दिवसांचा । विकार पूर्ण सहा वर्षांचा ॥
कानांत मंत्र सांगावा जैसा । प्रभाव चिलमीचा तो तैसा ॥ २२० ॥
झुरका एक चिलमीचा मारुनी । परत केली सविनय नमुनी ॥
दमा जो गेला तैं पासुनी । उठला न परतोनी केव्हांही ॥ २२१ ॥

यात्र मध्यें एके दिवशीं । बाळारामास उठली खासी ॥
परम विस्मय तो सर्वांसीं । कळेना कोणासी कारण तें ॥ २२२ ॥
मागून याची करितां चौकशी । बाबांनीं निजदेह त्याच दिवशीं ॥
ठेविला हें कळलें सर्वांसीं । खूण ही भक्तासी दाखविली ॥ २२३ ॥
बाळारामास ठसका जे दिवशीं । तेच दिशीं बाबा देहासीं ॥
झाले समर्पिते अवनीशीं । खूण ही तयासीं दिधली कीं ॥ २२४ ॥
तेव्हांपासूनि पुनश्च त्यासीं । कधींही आमरण उठली न खाशी ॥
या चिलिमीच्या अनुभवासीं । विसर कां कोणासी होईल॥ २२५ ॥
असो तो दिवसही गुरुवारचा । त्यांतचि चावडी मिरवणुकीचा ॥
तेणें द्विगुणित आनंदाचा । स्मरणीय साचा त्यां झाला ॥ २२६ ॥
आठापासून नवापर्यंत । बाबांसन्मुख आंगणांत ॥
टाळमृदंगाचिया तालांत । भजनरंगांत थाटतसे ॥ २२७ ॥
येकीकडे अभंग म्हणती । दुसरीकडे पालखी सजविती ॥
पालखी तयार झाल्यावरती । बाबा मग निघती चावडीस ॥ २२८ ॥
पूर्वीं सप्तत्रिंशत्तमोध्यायीं । चांवडीचिया नवलायी ॥
सविस्तरपणें वर्णिली पाही । द्विरुक्ति होईल येस्थानीं ॥ २२९ ॥
एक रात्र मशीदींत । दुजी चावडीमाजी काढित ।
ऐसा बाबांचा नेम हा सतत । आमरण अव्याहत चालतसे ॥ २३० ॥
देखावया चावडीचा सोहळा । उल्हास बाळाराम प्रेमळा ।
तदर्थ येतां चावडीची वेळा । धुरंधर मेळा मातला ॥ २३१ ॥
शिरडी क्षेत्रीचे नारीनर । बाबांस घेऊन बरोबर ।
उल्लासें करीत जयजयकार । निघाले चावडीवर जाया ॥ २३२ ॥

घातली ज्यावरी भरजरी पाखर । चढविले सुंदर अलंकार ॥
नामही जयाचें श्यामसुंदर । अघाडी थयकार करीत ॥ २३३ ॥

शिंगें कर्णे तुताऱ्या वाजत । त्या शृंगारल्या श्यामकर्णासहित ॥
संगें पालखी साई मिरवत । चाले भक्तावृत छत्रशिरीं ॥ २३४ ॥

ध्वजापताका घेती करीं । छत्र धरिती श्रीचे शिरीं ॥
वारिती मोरचेलेसीं चवरी । दिवट्या धरिती चौपासीं ॥ २३५ ॥

सवे घेऊन मृदंग सुस्वर । टाळघोळादि वाद्यें मधुर ॥
भजन करीत भक्त निकर । दुबाजू चालत बाबांच्या ॥ २३६ ॥

असो ऐसी ती रम्य मिरवणूक । येई जेव्हां चावडीसन्मुख ॥
बाबा थांबूनि उत्तराभिमुख । करीत विधिपूर्वक हस्तक्रिया ॥ २३७॥

दक्षिणांगीं बाबांचा भगत । निजकरीं बाबांचा पदर धरित ॥
वामांगीं तात्यापाटील हस्तांत । घेऊन चालत कंदील ॥ २३८ ॥

आधींच बाबांचें मुख पीतवर्ण । त्यांतचि दिपादि तेजाचें मिश्रण ॥
ताम्रमिश्रितपीत सुवर्ण । तैसें मुख शोभे अरुणप्रभा ॥ २३९ ॥

धन्य ते काळीचें पवित्र दर्शन । उत्तराभिमुख एकाग्र.मन ॥
वाटे करीत कोणास पाचारण । अधोर्ध्व दक्षिणकर करूनी ॥ २४० ॥

तेथूनि पुढें चावडीपती ॥ नेऊनि बाबांस सन्माने बसविती ॥
दिव्यालंकारवस्त्रें अर्पिती ॥ चंदन चर्चिती अंगास ॥ २४१ ॥

कधीं शिरपेच कलगी तुरा । कधीं सुवर्ण मुगुट साजिरा ॥
कधीं घालिती मंदिलगहिरा । भरजरी पेहराव सुरुचिर ॥ २४२ ॥

हिरे मोतीपाचूच्या माळा । प्रेमें घालीत बाबांचे गळां ॥
कोणी तयांच्या लाविती भाळा । सुगंध टीळा कस्तुरीचा ॥ २४३ ॥

कोणी चरण प्रक्षालित । अर्घ्य पाद्यादि पूजा अर्पित ॥
कोणी केशर उटी लावीत । तांबूल घालीत मुखांत ॥ २४४ ॥

घेऊनिया पंचारत । नीरांजन कर्पूरवात ॥
जेव्हां बाबांस ओवाळीत । शोभा तें दिसत अनुपम ॥ २४५ ॥

पांडुरंग मूर्तीचें वदन । ज्या दिव्य तेजें शोभायमान ॥
त्याच तेजें साईमुखमंडन । पाहूनि विस्मयापन्न धुरंधर ॥ २४६ ॥

वीज जैसी नभोमंडळीं । तळपे कोणा न लक्षे भूतळीं ॥
तैसे तेज साईच्या निढळीं ॥ चमकोनि डोळे दीपले ॥ २४७ ॥

पहाटे होती काकड आरती । गेले तेथें धुरंधरप्रभृती ॥
तथेंही बाबांचे मुखावरती । तीच तेजस्थिति अवलोकिली ॥२४८॥

तेव्हांपासूनि आमरणांत । बाळारामाची निष्ठा अत्यंत ॥
साईपदीं जी जडली निश्चित । यत्किंचित ती न ढळली ॥२४९॥

हेमाडसाई पदीं शरण । पुढील अध्यायीं ग्रंथपूर्ण ॥
सिंहावलोकनें होईल निरूपण । द्या मज अवधान शेवटचें ॥ २५० ॥

स्वस्ति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाई समर्थसच्चरिते । भक्तत्रयवृत्तकथनं नाम
एकपंचाशत्तमोध्यायः संपूर्णः
श्री साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

# श्री साईनाथ प्रसन्न.

क्र. सा. न. वि. वि. आजपर्यंत श्री "साईलीला" मासिकाची एकंदर सर्व व्यवस्था कै. गोविंदराव रघुनाथ दाभोळकर श्रींचे एक निस्सीम भक्त हे म्यानेजर या नात्याने पाहात असत त्याच्या आकस्मित निधनाने ज्यांचा ज्यांचा म्हणून शिरडी संस्थानशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निकट अगर दूरचा संबंध आहे अशा सर्व श्री साईबाबांच्या भक्तमंडळात दुःखकारक उद्गार निघत आहेत. व त्याची जागा कशी भरून काढावी ही विवंचनाही त्या मंडळांत पसरली आहे जग क्षणभंगुर आहे व जन्मास आलेल्या प्रत्येक प्राण्यास मरण हे ठरलेले आहेच आहे या सामान्य सृष्टिनियमाकडे लक्ष देऊन व आपल्या उच्चतम कार्यक्षेत्राची पूर्ण जाणीव बाळगून आलेल्या प्रसगास तोंड दिले पाहिजे, व आपला श्रीचे ठायीं असलेला निस्सीम भक्तिभाव व विश्वास पूर्ण जागृत अवस्थेत आणून व सर्व भिस्त श्रींवर ठेवून निर्भेपणाने, पण नेटाने व विश्वासाने आपले पुढील कर्तव्यकर्म केले पाहिजे. कै. गोविंदरावजींनीं पेन्शन घेतल्यापासून तों त्यांच्या स्वप्नवत् निधनापर्यंत मासिकाची, तशीच संस्थानची मोठ्या कळकळीनें रात्रंदिवस अविश्रांत मेहनत घेऊन सेवा केली. अशा विभूतीची जागा भरून काढणे तर दुरापास्त आहे तरी पण श्रींबद्दल वसत असलेली आपली जागृति मासिकाच्याद्वारे भक्तांच्या दृष्टोत्पत्तीस आणून त्यांची श्रींचे ठायीं असलेली श्रद्धा उत्तरोत्तर वाढविणे हाच एक सुलभ आणि राजमार्ग दिसत आहे. मासिकाचें ध्येय भक्तिमार्ग असल्याने कोणासही मासिकांत लिहिण्यास प्रतिबंध नाहीं श्रींच्या भक्तमंडळात बरेचसे उत्साही व भक्तिमार्गावर मनोभावे विचार करणारे सद्गृहस्थ आहेत अशा सद्गृहस्थांपैकीं कांहीं जण मजकडे श्री दाभोळकर यांच्या निधनानंतर आ॑
मासिक पूर्ववत् चालू ठेवण्याबद्दल मजला विनंती करूं लागले, आ
आनंदाने मजकडून लिहिण्याच्या बाबतींत अगर मासिक चा अन्य

करण्याच्या बाबतींत शक्य ती मदत देण्याचें अभिवचन त्यांस दिलें. प्रसिद्ध नाटयकार व कविवर्य श्री रा. ना. ठोसर, तसच श्रीचे कट्टेभक्त बाळासाहेब देव आणखी काहीं भक्तमंडळी मासिकांत भक्तिमार्गावर व श्रींच्या प्रासादिक वाणीवर लेख व कवनें लिहून मासिकाची सेवा करणार आहेत रावबहादुर कुळकर्णी, एक श्रींचे भक्त यांची सदरहू मासिक कायम राखण्याबद्दल आपणां सर्वांस आग्रहाची विनती आहे.

सदरहू मासिकाच्या सहाव्या वर्षाचा पहिला जोड अंक आपणाकडे पाठविण्यात आलेला आहे, ३–४ अंक ह्या सोबत आपणांकडे पाठवीत आहे.

श्रींचे लहान थोर हजारों भक्त आहेत हे मला पूर्ण अवगत आहे. त्यांनीं ह्या लीलेच्या प्रकाशनकामीं आपआपले अनुभव व भक्तिमार्गावर निबंध विलंब न करिता मजकडे जरूर पाठवावे. ह्यापुढे तरी किंचित्‌ही अनमान करूं नये ही सेवकाची नम्र विनंती.

आपला

चरणरज

**रामचंद्र आत्माराम तर्खड**

संपादक व प्रकाशक.

# श्री सद्गुरु सांईनाथ प्रसन्न

श्री सद्गुरु सांईबाबांच्या साक्षात् व अपरोक्ष दर्शनाचा लाभ ज्यांना ज्यांना म्हणून घडला, त्यांची त्यांची, त्यांच्या मनाच्या भूमिकेप्रमाणे श्रींच्या ठायीं श्रद्धा जडली. ह्या दर्शनोत्सुक मंडळींपैकीं कर्मठ ब्राह्मण युनिव्हर्सिटीचे मोठमोठे वकील, बॅरिस्टर, सॉलिसिटर, डॉक्टर, इंजीनियर, लहानमोठ्या अधिकारावर असलेले सरकारी अमलदार, हिंदु, मुसलमान, पार्शी, खिस्ती वगैरे सर्व जातींचे हजारों स्त्री-पुरुष आज हयात आहेत.

अशा महापुरुषाच्या सान्निध्यानें जे जे कांहीं अनुभव आले ते सादर होऊन श्री सांईमाउलीची प्रत्येकाच्या अंतःकरणांत प्रेमपूर्वक जागृति कायमची असावी ह्या हेतूने श्री सांईलीला प्रसिद्ध झाली.

श्री सांईबाबा कांहीं जादूटोणा घेऊन बसलेले नव्हते. वेदांताप्रमाणें ते पूर्ण ब्रह्मवेत्ते होते, म्हणूनच सर्वांचीं अंत.करणे, मनांत असलेले आचार व विचार, जवळ किंवा दूर असतांना, त्यांना आरशासारखे लख्ख कळत असत, व गम्मत ही की, प्रत्येकाला बाबा माझेच आहेत, व त्यांचे माझ्यावर पूर्ण प्रेम आहे, व सर्व संकटांत तेच माझे आधार, व त्यांच्याचकडून माझा संसाराचा योगक्षेम सुरळीत चालू राहील, अशी पूर्ण खात्री वाटत होती, व अद्यापिही वाटत आहे.

श्रीनीं प्रत्येकाची मानसिक व पारमार्थिक उन्नति कशी होईल हें ज्याच्या त्याच्या तयारीप्रमाणे जाणून त्याला तस तसें प्रोत्साहन दिले, आणि अद्यापिही देत आहे

ईश्वराचें अस्तित्व हीच एक मनुष्यप्राण्याच्या जीवनक्रमाची ( तो मानो अथवा न मानो ) खरी भावना आहे आपणाला ईश्वराच्या अस्तित्वाचा खरा प्रकाश केव्हां व कसा होईल ? ईश्वर आपणाला भेटेल काय ? अशी ज्याच्या ज्याच्या मनांत प्रेमपूर्वक आस्था उत्पन्न होत गेली त्या त्या भाविक स्त्री-पुरुषांना श्री सांईबाबांच्या सान्निध्यापासून अवर्णनीय लाभ झालेला लेखकाला माहीत आहे. शब्दज्ञानी पंडित हमेशा शब्दांचा कीस काढीत असतो, व त्यामुळें मूळ पुरुषाला आपल्या पोकळ पांडित्यानें तो भेटू इच्छित असतांही, जसें काय दोन दोन हातांनीं, दूर ढकलीत असतो. त्याच्या उलट निर्मळ आणि सरळ अंतःकरणाच्या श्रद्धावान् प्राण्याच्या

प्रेमाला ईश्वर इतका भुलून जातो कीं, त्यास तो आपलें सर्वस्व देतो, व जसजसे तो देत जातो तसतसे तो भक्त देवा, मला हे ऐश्वर्य नको, तुझें मजवरचे प्रेम निरंतर राहूं दे, मला आणखी कांही नको, असे बोलून प्रेमपूर्वक व निधास्त मनानें अद्वैत स्थितीचा लाभ घेऊनही जगांत सामान्य माणसाप्रमाणें वावरत असतो.

हे सर्व प्रकार श्री सांईबाबांच्या सान्निध्यांत राहून सूक्ष्म रीतीने अवलोकन करणाऱ्या जिज्ञासूंच्या दृष्टोत्पत्तीस आलेले आहेत.

अशा दिव्यज्ञान देणाऱ्या महापुरुषाची सांईलीला ही एक कायमची सेवा राहावी म्हणून वाचकांना आपआपले अनुभव सेवकाकडे पाठविण्याची प्रेमपूर्वक नम्र विनंती करीत आहे मी अज्ञान, मला काय कळते, माझे आपले साधेभोळे अनुभव, ते लिहून कशाला पाठवू, हा विचार मनांत मुळीच आणू नये परमेश्वराचे रहस्य साध्या-भोळयांच्याच अनुभवांत आहे म्हणून जी जी खरी खरी हकीकत घडलेली असेल ती श्रींचे स्मरण करून त्वरेने मजकडे पाठविण्याची कृपा करावी तिचा आदरपूर्वक स्वीकार करण्यांत येईल व श्री सांईलीलेत आनंदाने प्रसिद्ध होण्याची तजवीज करण्यांत येईल.

सर्व भक्तमंडळीचा चरणरज,

**रामचंद्र आत्माराम तर्खड,**

संपादक.

करूं लागला. गाडी सुटण्याची वेळ नजीक आली, आतां जास्त शहाणपणा करून उपयोग नाहीं, असा विचार करून आम्ही त्याच्या म्हणण्याप्रमाणे तर बायका माणसें बायकांच्या रिकाम्या डब्यात बसविलीं व सामानही त्यांत भरलें. हमाल म्हणे मला आता रु.०-६-० द्या तुम्हीही आपल्या डब्यात बसा. आम्ही त्यास रु.० ६-० दिले. तो निघून गेला. आम्ही शेजारच्या डब्याजवळ गेलों व साधी किल्ली दारास लाविली तों ते दार उघडले. आंत तीन चारच मुसलमान भाई होते. त्यांनीं आम्हांस मोठ्या आदराने आंत बोलाविले व आम्हीं सर्व ग्रँटरोड स्टेशनर उतरणार आहों व ग्रँटरोडवर फक्त आमचा एकच इसम या डब्यात येणार आहे करितां तो व तुम्ही या डब्यांत खुशाल निजून अहमदाबादपर्यंत जा असे सांगितले. आम्ही डब्यांत शिरलो. गाडी सुटली. आमची बायका माणसे काळजी करीत बसली कीं, आम्हांस बसण्यास जागा मिळाली कीं नाहीं. आम्हांसही त्याच्याचसारखा रिकामा डबा त्यांच्याच शेजारी मिळाला हें त्यांना सांगण्यास आम्हाला अवधी मिळाला नाहीं. ग्रँटरोड स्टेशन आले. ती मुसलमान मंडळी उतरली, व त्याचा येणारा एकच इसम त्या डब्यात चढला. आम्हीं ही हकीगत आपल्या बायका माणसाना कळविली व आम्ही सर्व मंडळी त्या डब्यात अहमदाबादेपर्यंत खुशाल झोंपून गेलों. मग यात काय विशेष आहे; असें सकृद्दर्शनीं कोणासही वाटेल; परंतु जरा खोल विचार केला तर बायकांच्या शेजारच्याच डब्यात तुम्हीं बसा हे हमालाचे पुनः पुनः सांगणे, डब्याचें दार साध्या किल्लीने उघडणे व आंतील मुसलमान भाईनी आमच्याकरिताच म्हटले तरी चालेल सर्व डबा राखुन ठेवणे व आम्हांस आदरपूर्वक बोलावणें यात खात्रीनेंच श्रीगुरुमाऊलीचीच लीला भरलेली आहे. तिचीं लेंकरें अडचणींत सापडली, कीं ती, ती अडचण दूर करण्यास अगदीं आपल्याजवळ उभी असते यात तिळप्राय संदेह नाहीं. आम्ही मात्र अशा प्रसंगाचें स्मरण ठेवून त्यांचें अंतःकरण पूर्वक मनन करून त्या गुरुमाऊलीचें अखंड चिंतन करीत राहिलें पाहिजे.

सन १९२८ चे गुडफ्रायडेच्या सुटींत आम्ही शिरडीहून पंढरपूराला जातांना वाटेंत नगरास उतरलो व रात्रीं नगर स्टेशनवर जाऊन तेथून पंढरपूरची

तिकिटें घेतलीं.आमच्याबरोबर ५-७माणसें होतीं. नगर स्टेशनवर गाडी आली.ती चिकार भरलेली होती. आम्हांस जागा कोठेच मिळेना आमची त्रेधा उडाली.गाडी सुटण्याची वेळ आली.इतक्यांत एक इसम तेथें आला व आम्हांस म्हणाला अहो, हा सोडावाटरचा डबा रिकामाच आहे यात शिरा. आम्ही म्हणालों सोडावाटरवाला आम्हांस कसा येऊं देईल ? तो म्हणाला तुम्हांस काय त्याचे. मी त्यास सांगतो तुम्हीं बेलाशक शिरा. आम्हीं सामानासह त्यांत शिरलों सोडावाटरवाल्याने काहीं तक्रार केली नाहीं. परंतु इतक्यांत रेल्वेचा व एक दुसरा इसम येऊन आम्हांस खाली उतरण्यास सांगू लागला. आता काय करावे. अशा विवंचनेत आम्हीं असता तोच पहिला इसम तेथे आला व ह्या दुसऱ्या इसमास बोलूं लागला कीं, तीं माणसें तेथे बसलीं म्हणून तुझें काय बिघडले ? तो दुसरा इसम म्हणाला अरे स्टेशन मास्तरास कळले म्हणजे तो त्यांना खालीं उतरवील व आपली खरडपट्टी काढील. तेव्हां तो पहिला इसम त्यास म्हणाला अरे, तूं काय समजतोस व स्टेशन मास्तर तरी काय करणार ? तीं माझीच माणसें आहेत.जा,व आम्हास म्हणाला कीं तुम्हीं कोणाचे काहीं ऐकू नका व डब्यांतून खालीं उतरूं नका तुम्हांस कोणी काहीं करणार नाहीं. बिन दिक्कत जा. आम्हीं तसेंच केलें गाडी सुटली व सकाळीं कुर्डुवाडी स्टेशन आल्यावर आम्ही खालीं उतरलो. तोपर्यंत आम्हांस कोणी काहींच विचारले नाहीं. काय चमत्कार ! ही कोणाची लीला ? हीं माझी माणसे आहेत असे म्हणणारा इसम आम्ही कधींही पूर्वी पाहिलेला नाहीं. त्याची आमची केंव्हाचीही ओळख नाहीं. आम्हास त्याचे नाव, गांव जात गोत काहीं माहीत नाहीं. असे असून हीं माझीं माणसे आहेत असे आयत्या वेळीं सांगून आमची सोडावाटरच्या डब्यांत निरपेक्षबुद्धीने सोय लावून देणारा व आमची अडचण दूर करणारा हा गृयस्थ तरी कोण ? ही आमची साईमाऊली नव्हे का ? ही आमची भक्तवत्सल सद्गुरु माऊली नव्हे का ? नसेल तर तो गृहस्थ कोण ? तो आमच्या दिडकीचा ओशाळा नव्हता. मग त्यास आमच्याबद्दल इतके प्रेम का वाटावें ! कित्येक प्रसंगीं वजनदार गृहस्थाने वेळीच तक्रार केली व रेल्वेचे नोकर सुस्वभावी असले तर दाद लागत असेल. किंवा द्रव्य खर्च केले तर दाद लागत असेल. पण आमच्या या प्रसंगांत दोहींपैकी

अभावच आम्ही कोणाकडे तक्रारही केही नाहीं व कोणास दिडकीही दिली नाहीं. असे असून आम्ही इकडे तिकडे जागेसाठीं गाडीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फेरे मारीत असतां स्वयंस्फूर्तीनें आमचीं कींव करून ही माझी माणसे आहेत असे आम्हास त्या डब्यांतून उतरूं पाहणारास सांगून व तुम्हास कोणी विचारणार नाहीं. तुम्ही बेलाशक त्या डब्यांत बसून जा. अशी आमची खात्री करून आमची सोय लावणारा हा गृहस्थ कोण? हल्ली प्रत्येक गोष्ट भौतिक शास्त्राच्या उपनेत्रानीं पाहाण्याची प्रवृत्ति पडली आहे. व त्या शास्त्रास अनुसरून जर मला वरील अनुभवाची किंवा बाबांच्या विश्वव्यापकतेची मीमांसा विचारली तर मी कदाचित् निरुत्तरच होईन; पण भोळ्या भाबडया श्रद्धेच्या मीमांसेनुसार जर विचारलें तर मी मात्र म्हणेन कीं, तो इसम म्हणजे ती आमची गुरुमाऊली बाबाच. कारण आमच्या अडचणीचा तिच्यावांचून दुसऱ्या कोणास कळवळा येणार! ती सदैव वाटेल त्या स्वरूपात अडचण प्रसंगीं हजर राहून आमची अडचण दूर करते. आम्हीं मात्र प्रसंगविशेषीं निर्हेतुकपणानें उपयोगी पडलेल्या मनुष्याच्याच सौजन्याची तारीफ करीत बसूं व ज्या गुरुमाउलीने त्या इसमास ती सद्बुद्धि दिली किंवा त्याच्या अंगात आपणच सद्बुद्धीरूपाने संचार केला तिच्या भक्तवात्सल्यबुद्धीचे निरंतर भक्तियुक्त अंतःकरणाने स्मरण ठेवले नाहीं, तर आपण मात्र गुरुमाऊलीने आपणावर याप्रमाणे पदोपदीं केलेल्या उपकाराबद्दल निःसंशय कृतघ्न ठरल्यावाचून कसे राहूं!

ठाणे,<br>
१५-५ २९

**बाबांचें बाळ**

## सविनय प्रार्थना.

श्री साईलीलेच्या ४ थ्या वर्षाच्या ६ व्या अंकांत " शिरडी संस्थान कायमनिधि समुच्चय योजना " या मथळ्याखालीं कायमनिधि जमविण्याकरितां माझ्या अल्प समजुतीप्रमाणे पांच सूचना केल्या होत्या व त्यावर संपादक महाशयांनीही त्यांत थोडीशी भर घालून आपला अनुकूल अभिप्राय प्रसिद्ध केला होता.

माझ्या माहितीप्रमाणे कायम निधीची रक्कम फार फार तर २५००० रुपयेपर्यंत गेली असेल, व या मानानेच पाहिले तर एक लक्षाची मजल गांठण्यास कल्पनातीत काल लागणार हे उघड आहे.

सुमारें ३–४ महिन्यांच्या पूर्वी श्रीयुत भक्तवर्य रावसाहेब आप्पासाहेब कुळकर्णी स्पेशल ड्युटी ऑफिसर बाँबे सेक्रेटारिएट हे भेटले व म्हणाले कीं मी शिरडीहून जाऊन आलों. तेथे कोणी तरी आपल्यापैकीं इसम जाऊन राहिल्या-शिवाय त्या ठिकाणची व्यवस्था समाधानकारक राहणार नाहीं. त्यांचे म्हणणे अगदींच सत्याला सोडून आहे असे नाहीं. परंतु तेथे राहणारा इसम कितीही योग्य असला तरी जरूर तितक्या द्रव्याभावीं तो तरी काय सुव्यवस्था करणार?

त्याचप्रमाणें सुमारे दीड दोन वर्षामागे श्रीयुत अण्णासाहेब दाभोळकर श्रीसद्गुरु बालमूर्ति नरसिंहबाबा महाराज पांचलेगांवकर यांच्या समवेत इतर भक्तमंडळीसह महाराजाच्या गावी निजामसाहेबांच्या हद्दींत गेले होते. तेथें महा-राजानीं त्यांना एक अशी संस्था ( मंदीर ) दाखविली. त्या संस्थेंतील व्यवस्था पाहून सर्व मंडळी फार खूष झाली त्यांना अत्यंत समाधान वाटले. त्यांनीं तेथील व्यवस्थापकांची फारच वाखाणणी व तारीफ केली व त्या मानाने शिरडी येथील व्यवस्था कांहींच नाहीं असे सर्वांना वाटले.

मी म्हणतों ही गोष्ट खरी असेल; पण त्या ठिकाणीं तारीफ करण्या-सारखी व्यवस्था होते व शिरडीस होत नाहीं असे नाहीं याचे मूळ कशांत आहे, व याचें लांछन कोणास आहे! शिरडीच्या अव्यवस्थेचें मूळ थोडेसें योग्य व्यवस्थापकांच्या अभावांत असेल, नाहीं असे नाहीं, परंतु तें बहुतांशीं पुरेसे पैशाच्या अभावातच आहे. अशी माझी समजूत आहे.

हल्लीची दरमहाच्या खर्चाची व्यवस्था म्हणजे मंदिरात ठेविलेल्या पेटींत जी रक्कम महिन्याच्या शेवटीं जमत असेल ती, महिनेमहा नित्य दिनचर्या कोठी-निधीकडे जी रक्कम जमत असेल ती व कायमनिधीची जी व्याजाची रकम येत असेल ती, या तीन उत्पन्नांच्या बाबीवर अवलंबून आहे.

पेटींत फारसे पैसे जमत नाहींत. शिवाय शिरडींत दरसाल जे चार उत्सव होतात ते ज्या महिन्यांत होतात त्या महिन्याच्या पेटींतील उत्सवाच्या वेळच्या ५ दिवसांची जमा, त्या उत्सवकार्याकड देण्याचें संस्थान कमेटीने ठरविले आहे व पेटींत जास्त रकम जमणार ती जेव्हां उत्सवप्रसंगीं जास्त भक्तमंडळी येतील तेव्हांच. इतर दिवसांत पेटी रोडलेलीच असते.

महिनेमहा देण्याची कबूल केलेली रक्कम तर कांहीं भक्तमंडळीकडून येतच नाहीं, व ज्यांच्याकडून येते ती नियमितपणे येत नाहीं.

आता राहतापैकीं राहिली तिसरी बाब व्याजाची. वीस पंचवीस हजारांवर दरसाल दर शेकडा ३॥ टक्केप्रमाणे दरमहा ती कितीशी येणार! ती पुन्हा सहा महिन्यांनीं एकदा मिळणार. दरमहाचे दरमहा मिळावयाची नाहीं.

याप्रमाणें वरील उत्पन्नाच्या तिन्ही बाबी मिळून महिन्याच्या खर्चाची तोंडमिळवणी कशीबशी करावयाची, व इतकेही करून तोंडमिळवणी झाली नाहीं म्हणजे मूळ कायमनिधीस कुरतडावयाचे.

या तिन्ही उत्पन्नाच्या बाबींत नियमित व कायमची बाब म्हणजे काय ता एक व्याजाची. बाकीच्या दोन्ही बाबी अनियमित व तात्पुरत्या. त्या नेहमीच दात्यांच्या चढत्या उतरत्या परिस्थितीवर, त्यांच्या सोई गैरसोईवर व त्यांच्या लघु किंवा दीर्घ आयुर्मर्यादेवर अवलंबून राहावयाच्या. ज्यांच्या हातून संस्थानचा खर्च होतो त्यांनाच त्या अडचणी भासणार व त्यांची कल्पना येणार. इतरांस असमाधान व्यक्त करून प्रतिकूल टीका करण्यापलीकडे खऱ्या अडचणींची कल्पना यावी कशी ? मी त्याना याबद्दल बिलकूल दोष देत नाहीं. पण टीकाकारही बाबांचे भक्तच आहेत त्यांनींही या अडचणींचा खोल विचार करून त्या अंशतः तरी दूर करण्याची तजवीज करून संस्थानची इभ्रत वाढविण्याचा प्रयत्न केल्यास किती तरी सुंदर गोष्ट होईल.

बाबाचे जे भक्त आहेत त्यांच्या मागे त्याचे चिरंजीव, माता-पिता, बंधू-भगिनी हा बाबांच्या भक्त होतीलच असा कांहीं नियम नाहीं. ही भक्ति ज्याच्या त्याच्या

पुरतीच असते असा साधारण अनुभव आहे. व कदाचित् त्यांच्या मागें त्यांचे चिरंजीव, माता, पिता, बंधुभगिनी जरी भक्त राहिले तरी ते आपल्या वडिलांचे किंवा चिरंजीवांचे, बंधूंचे अथवा भगिनींचे "शाच्या बाबतींतील व्रत तितक्याच उत्कट प्रेमाने नेहमी चालवितील असें नाहीं

अतएव पेटींतील जमेवर व दरमहा हल्लीं येत असलेल्या अनियमित वर्गणीवर दरमहाच्या खर्चाकरतां अवलंबून रहाणे व त्यांत सुव्यवस्था ठेवण्याची आशा करणें हे केव्हाही योग्य होणार नाहीं. त्यासाठीं उपरिनिर्दिष्ट वर्षाच्या ६ व्या अंकात लिहिलेल्या ५ मार्गांनीं किंवा अन्य योग्य मार्गानें प्रथम एक लक्ष रुपयाचा निधि जमविणे हेच बाबांच्या भक्तांचे आद्य कर्तव्यकर्म आहे असें मला वाटते. व एकदा हा कायम निधि जमला म्हणजे कोणास केव्हाही इतर तात्पुरत्या व अनियमित जमणाऱ्या द्रव्यसमुच्चय साधनावर अवलंबून न राहता कायमची समाधानकारक व सुंदर व्यवस्था करण्यास अडचण पडणार नाहीं.

आधुनिक कालामध्ये बाबासारखे जगाच्या कल्याणासाठीं संतचूडामणि निर्माण झाले असून व लाखों भक्तास त्यांचे हयातींत लाखों अनुभव आले असून व त्यांचे पश्चात हल्लींही लाखो अनुभव पदोपदीं येत असून, शिरडी संस्थान कायमनिधिसमुच्चयासबंधाने इतका भयकर निरुत्साह, इतकी अनपेक्षित अनवस्था व इतकी कल्पनातीत उदासीनता कां नजरेस पडावी हे मनांत आले म्हणजे एक प्रकारचे सखेदाश्चर्य वाटतें.

इतर प्रसिद्ध तीर्थसंबंधानें, क्षेत्रासंबंधानें व संतसंस्थानासंबधाने इतका निरुत्साह, इतकी अनवस्था, इतकी उदासीनता दिसत नाहीं. उलटपक्षीं कांहीं कांहीं ठिकाणचे द्रव्यनिधि कल्पनातीत असून तेथील व्यवस्था किता घेण्यासारखी आहे. मग शिरडीसंबधानेंच हा प्रकार का ?

बाबांच्या भक्तसंख्येंत कमतरता नाहीं. त्यांचे भक्त जगभर नसले तरी सर्व हिंदुस्थानभर थोडयाफार प्रमाणांत असंख्य भरलेले आहेत. बाबांच्या कीर्तीचा डंका जगभर वाजत आहे. बाबांचें नांव जगभर गाजत आहे. बाबांच्या

भक्तात त्यांच्याच कृपेने पुष्कळ भक्त भाग्यवान, कुलशीलवान, कर्तृत्ववान, ज्ञानसंपन्न, विचारसंपन्न, ऐश्वर्यसंपन्न, व धनसंपन्न आहेत. मग बाबांच्या कायम निधीबद्दल इतका निरुत्साह कां ?

सांसारिक अडचणी ह्या प्रत्येक भक्तास आहेतच. मग तो श्रीमंत असो वा गरीब असो. पैशाची टंचाई नाहीं कोणाला ! राजेरजवाडयानासुद्धां आहे. पण प्रत्येकाची जी आवडीची, जरूरीचीं किंवा तलफेची गोष्ट असते त्याकरितां तो त्यांतल्या त्यात जरूर ते द्रव्य दररोज स्वतःच्या कमाईचे, कर्ज काढून, किंवा भिक्षा मागून खर्च करतोच कीं नाहीं. व याचे कारण तो वरील गोष्टीस अग्रस्थान देतो. मला वाटते सर्वांत अग्रस्थानाचा किंवा अग्रदेयाचा मान जर कोणाचा असेल तर तो गुरुसेवेचा आहे. वरील गोष्टींत जसा नियमाने पैसा खर्च होतो त्यास सर्वस्वीं फाटा देऊन किंवा तसे होणे अशक्यच असेल तर निदान त्यास काटकसरीची तरी कात्री लावून त्यात जी बचत होईल ती तरी हें अग्रदेयआहे असे समजून या निधीस देण्याचा प्रत्येक भक्ताने श्रद्धायुक्त अंतःकरणपूर्वक निश्चय करावा अशी माझी सर्व साईभक्ताना श्रीसाईलीला वर्गणीदाराना व वाचकांना अत्यंत कळकळीची पण नम्र विनती आहे. माझी अशी पूर्ण खात्री आहे कीं, सर्व साईभक्तानीं ही एक लक्ष कायम निधि जमा करण्याची गोष्ट मनावर घेतली तर हा निधि हा हां म्हणतां जमा होईल. व सद्गुरुमाउलींचे दरबारात मनाजोगी व्यवस्था होण्यास अडचण पडणार नाहीं. सर्व साईभक्तानीं या कार्याकरितां आता क्षणाचाही विलंब लावूं नये. ज्यांनीं अगोदरच सुरवात केली असेल, ज्यांनीं अगोदरच कबूल केलेली वर्गणीही भरली असेल त्याच्याबद्दल माझे काहींच म्हणणे नाहीं. परंतु ज्यांनीं अद्यापपावेतों सुरवातच केली नसेल अगर कै० भक्तश्रेष्ठ परमपूज्य विद्वान काकासाहेब दीक्षित यांच्या विनंतीस मान देऊन योग्य व त्यांना साजेशी वर्गणी देण्याचें अभिवचन देऊन ती अद्याप दिली नसेल त्यांनीं ती कृपा करून सर्व किंवा थोडथोडी देण्यास सुरवात करावी. व स्वसंतोषाने आंगावर घेतलेल्या या नैतिक जबाबदारीतून व बाबाच्या नैतिक ऋणातून मुक्त व्हावें.

बाबांच्या निधीचें काम बाबाच करणार. सर्व भक्त निमित्तमात्र आहेत हे यद्यपि खरें असलें तरी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रयत्न करणें यांतच परम श्रेय भरलेलें आहे असे मला वाटते संसारश्रांताची साउली व परमार्थज्ञानामृताची माउली श्री सद्गुरुराज बाबा सर्व साईभक्ताना कायम निधि जमविण्याची सुदूबुद्धी देऊन त्याचे अंतःकरणांत तीव्र प्रेरणा करोत.

श्रीयुत श्रीसाईलीला संपादक महाराजांनीं वरील पांच मार्गांपैकीं अथवा अन्य योग्य मार्गाने कोणी कोणा केव्हां केव्हां व कसकसे प्रयत्न केले आहेत त्यांच्याबद्दल जशी पूर्वीं दोनतीन वेळा श्री साईलीलेंत माहिती दिली आहे तशी पुढेही वेळोवेळीं दिल्यास त्यापासून प्रयत्न करणारांना बरेच उत्तेजन येऊन सुरवात न करणारांना त्यांचे मानसिक निश्चयशैथिल्य जाऊन कांहीं तरी कर्तव्य-जागृति उत्पन्न होईल.

संपादक महाशय, मी वर लिहिलेल्या प्रार्थनेंत स्वतःची योग्य ती भर घालण्याची व वरील माहिती वेळोवेळीं प्रसिद्ध करण्याचीं गोड कामगिरी आनंदाने करतील अशी आशा आहे.

शिरडी शब्दाची व्युत्पत्ती, कै. भक्तवर्य नानासाहेब चांदोरकर यांचे दोन अनुभव, सिद्धपूर यात्रावर्णन, माझे स्वतःचे बाबांच्या विश्वव्यापकतेसंबंधानें दोन छोटेसे अनुभव व सविनय प्रार्थना याप्रमाणे रंगीबेरंगी सतदलवाक्कमल ज्याच्या कृपेनें वरील गोष्टी लिहिण्याची प्रेरणा झाली त्याच अनन्यगतिक परम कारुणिक विश्वपितर श्रीसद्गुरु साइमाउलीचे पुण्यचरणीं श्रद्धायुक्त अंतःकरणाने अर्पण करून त्या दिव्य चरणाना सप्रेम साष्टांग नमस्कार करून आपली रजा घेतों.

ठाणे,
ता. २७-५-२९.

**बाबांचें बाळ.**

## श्रींची पालखी व पालखीची खोली.

हल्लीं जी पालखी आहे ती हर्डयाहून आली; ती पुष्कळ दिवस मशिदीचे सभामंडपांत समोर जो मोठा धोडा आहे व ज्यावर श्रीसाईबाबांच्या पादुका आहेत त्याच्या व तुळशी वृंदावनाच्या मध्यें सुमारे एक महिना होती. पालखीचा मुख्य म्हणजे बसण्याचा व छपराचा भाग हे एका पेटींत प्याक केलेले होते व दाडयाचा भाग निराळा प्याक केलेला होता. बाबाचे कांहीं भक्त मोठया आतुरतेने ती पालखी बाहेर काढून सजविण्याबद्दल श्रींची परवानगी रोज मागतच होते व बाबा म्हणत ' कढू रे, थांबा. ' असे बरेच दिवस चालले होतें.

मग एक दिवस रा. र. भा. पुरंदरे श्रींचे एक भक्त यानीं बाबाना विनंती केली कीं, " आज पालखी सजवूं. आज मीं ती पेटींतून काढतो. " बाबा त्याच्या वर फार चिडले व म्हणाले, ' नाहीं, मला नाहीं पाहिजे पालखी मला नाहीं लागत काहीं. ' त्यावर पुरंदऱ्यानीं हट्टच घेतला कीं, पालखी तर येऊन पडली आणि आतां ' ती मला लागत नाहीं, ' म्हणून काय उपयोग ? मी ती आज काढतों व सजवतों, असे म्हणून पुरंदरे श्रीचे पाया पडून उठले व पेटीजवळ गेले. बाबा शिव्या देतच आहेत. पेटी त्यानीं उघडली, पालखी बाहेर काढली, दांडा जिकडील तिकडे लावला, पालखी सजवली व आणि मग हळूहळू शिव्या बंद झाल्या. पुरंदरे बाबास म्हणतात, " बाबा आज चावडीचा दिवस आहे. आज पालखी काढावयाची व आज आपल्याला पालखींत बसवून चावडींत न्यावयाचें, ' बाबा म्हणाले. ' नाहीं काढावयाची. जाय, तू ती घेऊन तशीच चावडीत नेऊन ठेव. ' पुरंदरे म्हणाले, ' अशी रिकामीच चावडींत कशाला न्यावयाची. रात्रीं चावडीचे मिरवणुकीच्याबरोबर चावडींत नऊं ' हें बोलणे दोन प्रहरीं आरतीनंतर झाले, व पालखी सभामंडपांत गोंडे वगैरे लावून तयार करून बाबाच्या समोरच मध्य भागीं ठेवली. सजवणें चालले असतां बाबा पालखीकडे पाहात बसले होते. पुढें मग सर्व मंडळी श्रींची उदी घेऊन त्यांच्या पाया पडून घरोघर गेली.

बाबा आपल्या सायंकाळच्या फेरीला नित्यक्रमाप्रमाणे निघाले. पुढे चावडीचा वेळ आला तो नव चा सुमार होता. कै. बापूसाहेब जोग तयार होऊन मंडळीसह नेहमीप्रमाणे कै. राधाकृष्णा आईकडे गेले तिकडे क. बापूसाहेब बुटी, काकासाहेब दीक्षित, बाळासाहेब भाटे आदीकरून चोपदारासह सर्व मंडळी चावडीस लागणारे इतर सामान म्हणजे गरूडटक्के, चवऱ्या, मोर्चेल, अबदागीर वगैरे घेण्याकरिता व नाममुद्रा इत्यादिक लावण्याकरितां नेहमींप्रमाणें जमली होती. तेथे रा. जोग याजला पुरंदरे म्हणाले, 'बापूसाहेब आज आपण उतावळी करू नये, आज पालखीशिवाय चावडी करावयाची नाहीं.' बापूसाहेब म्हणाले, 'आज दोन प्रहरपासून तुमची पूजा थोडी झाली काय? तुम्हाला वाटेल तें तुम्हीं करा मी त्यांत पडणार नाहीं.' काकासाहेब म्हणाले, 'पुरंदऱ्याचे व बाबांचे ठीक चालते. त्यांना वाटेल ते करू द्या; पण चावडीची घाई करू नका.' 'पुरंदरे म्हणाले मी मार खाल्ला तरी चालेल, पण मीं पालखी उचलल्याशिवाय मिरवणूक निघणार नाहीं.' सर्व मंडळीचीही मनातून तशीच इच्छा होती. पुढें पुरंदरे वगैरे काहीं मंडळी येऊन बाबाच्या पाया पडून पालखी उचलावयास लागले. बाबा वगैरे मंडळी नित्याप्रमाणे चावडीत जावयास उठताच 'श्रीसद्गुरू साईनाथ महाराजकी जय' असा जयशब्द मोठ्याने उच्चारून पालखी उचलली तेव्हा बाबा बापूसाहेब जोगास म्हणाले,'हे आज काय आहे?' बापूसाहेब म्हणाले, पुरंदरे आज ऐकत नाहींत. पालखी उचलीत आहेत. तेव्हां बाबा म्हणाले,'तो फार चेवला आहे,त्याला मी बघून घेईन.' मग पुरंदरे खालीं जोत्याजवळच्या पडवींत जाऊन म्हणाले, 'बाबा पालखी घ्यावयाची नाहीं?' बाबा म्हणाले 'तशी नाहीं उचलावयाची तुला उचलावयाची आहे तर सवाशे टेंभे लाव आणि मग उचल.' पुरंदरे म्हणाले, 'आता लावतों' त्याप्रमाणें तितके टेंभे तयार करून पेटवून मिरवणुकीबरोबर घेतले व मग पालखी काढली. ११२ रात्र ती पालखी चावडीत खुलीच होती. त्या ठिकाणांतून पालखीचा १ चांदीचा कळस व तीन रेशमी गोंडे चोरीस गेले तेव्हां सर्वांच्या विचारें असें ठरले कीं, मशिदीच्या उत्तर भागाला पालखीचा बंदोबस्ताची पेऱ्यांची खोली करून

तींत पालखी ठेवावी; पण मशिदीच्या त्याबाजूच्या भिंतीला पत्र्यांसाठीं आडवे तीन वासे घालण्यासाठीं भोके पाडणे भाग होतें. पण मशिदीच्या भिंतीला बाबा सुखाने भोकें पाडूं देणार नाहींत हे भय होते. त्या बाजूला नारायण तेल्याचे घर आहे. त्याच्या भिंतीलाही समांतर तीन भोकें पाडावयाचीं होतीं;पण त्याची कांहीं हरकत नव्हती.तो बाबांचा भक्तच होता.बाबा परवानगी देणारच नाहींत मशिदीचा सभामंडप बांधण्याच्या प्रसंगीं बाबांनी अकांड तांडव केलें होते त्या वेळचा बाबाचा अनुभव सर्वांस होताच. म्हणून ही खोली तयार करण्याचे कामीं त्याची परवानगी घेण्यांत हासल नाहीं. उलट प्रतिबंध मात्र होईल अशी सर्वांची खात्री होती म्हणून त्यांच्या परवानगीवांचून काम करावयाचे असे ठरूनच दुसरे दिवशीं सकाळीं नित्यप्रमाणें बाबा लेंडीचे फेरीला गेल्याबरोबर या कामाला पुरंदरे वगैरे मंडळीने सुरवात केली या फेरीहून परत यावयास बाबाना सुमारे तास दीड तास लागे. तितक्या अवकाशांत मशिदीच्या भिंतीला व नारायण तेल्याच्या भिंतींत भोकें पाडून एक वांसा तर बसवला व दुसऱ्या वाशाचे नारायणतेल्याच्या भिंतीचें भोंक पुरे होऊन मशिदीच्या भिंतीचें भोंक अर्धवट झाले होते इतक्यात बाबा लेंडीवरून परत आले. तो १० चा सुमारहोता. बाबा येतांच काम करणाऱ्या मंडळीपैकीं व काम चाललेले पाहात राहिलेले रिकामपणें मौज पहाणारेही सर्व लोक पळाले. राहतापैकीं फकीरा ( तुळशीराम चेंडयाचा भाऊ) व रा. पुरंदरे हे दोघेच तेथे राहिले. फकीरा हातात एका बाजूचे वाशाचे टोंक धरून नारायण तेल्याच्या घरावर होता व पुरंदरे लाकडाच्या घोडया-वर उभे राहून मशिदीच्या भिंतीचे भोंक पाडण्याचें काम पुरें करीत होते व त्यामुळें आयतेच बाबांचे तडाक्यांत मिळाले. बाबा पुरंदऱ्याचे जवळ येतांच पुरंदरे खालीं उतरले व बाबानीं त्यांच्या मानेला धरून त्यांना रागानें विचारलें काय रे करतोस ?' बाबा आपल्या पालखीला घर करतों ' असें पुरंदरे म्हणाले. त्यावर बाबा रागानें म्हणाले "मागें आला, माझी मशीद खादली अवघा पैका नेला निंबरवी काढले आणि आता भिंत पाडितो चवला आहे " असें म्हणत-म्हणत त्यांना ढकलीत ढकलीत सभामंडपाच्या दरवाज्यांत नेलें व इकडू-

चालता हो,नाहीं तर तुला मारीन याद राख.' असे म्हणून विटकर उचलली. पुरंदरे म्हणाले,'मला मारा अथवा काय वाटेल ते करा मी ती पालखीची खोली केल्याशिवाय येथून जाणार नाहीं.' मग बाबानीं त्याला ढकलीत ढकलीत व तोंडानें शिवीगाळ करीत करीत त्याना त्या होणाऱ्या खोलींत थेट मागल्या भिंतीपर्यंत नेले व विचारिले कीं,येथें तू काय केलेस ? पुरंदऱ्यानीं झालेलें काम दाखविले व म्हणाले कीं.मला आणखी एक भोक पाडावयाचे, वासे घालावयाचे व वर पत्रे टाकावयाचे एवढेच काम आहे म्हणजे खोली तयार होते. त्यावर बाबा म्हणाले, 'मला काहीं लागत नाहीं, तू येथून चालता हो.' पुरदरे म्हणाले,'एका रात्रींत पालखीचे तीन गोंडे गेले व एक कळस गेला मग पालखी आणवली कशाला ? मी खोली केल्यावाचून राहाणार नाहीं. त्यावर बाबा फारच रागावले व शिव्याचा वर्षाव अतोनात झाला "मला पालखी लागत नाहीं, तू माझी बरोबरी करतोस ? नारयण तेल्रीबी मागतो, वाणीबी मागतो राडाबी चेवल्या, भडवेबी चेवले मीतर कोणाच्या कोरभर भाकरीचा ओशाळा नाहीं. त्या बी मला वैताग आणला आहे. याद राख. तुला बघून घेईन." असे म्हणून पुरंदऱ्यांस त्या खोलींतच ढकलून देऊन मग पाय धुवावयास पायरीवर गेले व पाय धुवून मशीदींत चढले. शिवीगाळ सुरूच होती. येणाऱ्या जाणाऱ्यावर कातवतच होते.

इकडे पुरदऱ्यानीं दुसरा वासा बसवून तिसऱ्याला सुरवात केली. तेव्हां बाबानीं 'आण त्याला इकडे' असे म्हणून पुरदऱ्यास बोलावणे पाठविले. त्या वेळीं हळूहळू मशिदीचे भिंतीच्या तिसऱ्या भोकाला सुरवात झाली होती. पुरंदरे मशिदींत जाऊन कठडयाजवळ बाहेरल्या बाजूला उभे राहिले. बाबा त्याला म्हणतात, "तूं नाहीं का ऐकत आतां, तू माझी देवळी ( पणती ठेवण्याचा कोनाडा ) फोडशील" पुरंदरे म्हणाले, "देवळी फुटण्याजोगे मोठे भोक पाडावयाचे नाहीं; उगाच वाशाला आधार करावयाचा आहे." त्यावर बाबा शांत होऊन म्हणतात, "बरें आता जा तुला लागेल तसे करून घे मग आपण चांगलें करून घेऊं जा" झालें, यापुढे आरती सुरू झाली. पुरंदरे आपले कामावर गेले. आरती आटपली. मंडळी नित्याप्रमाणें उदी घेऊन घरोघर जेवावयास गेली व जेवून नेहमीं बाबापाशीं पुन्हा बसावयास येणारी मंडळी परत आल्यानंतर बाबा काकासाहेबास

म्हणाले, " याला आतां काय करावे हा चेवला आहे. लोक सगळे जेवून आले तरी हा ( पुरंदरे ) जेवालाबी जात नाहीं." त्यावर काकासाहेब म्हणाले, " त्याची रजा भरत आली, तेव्हां ते आतां काम आटोपावयाला बघतात, त्याला जेवावयाला पाठवूं का ? " बाबा म्हणाले, ' तो काय तुझें ऐकतो, माझे ऐकत नाहीं, मोठा खट्याळ आहे. " मग भागोजी शिंद्याला त्यांना बोलावयास पाठविले पुरंदरे बाबापाशीं आले व पायां पडले. त्यांना रडूं कोसळलें. बाबा विचारतात,"अरे रडतोस का ?" पुरंदरे म्हणतात, "माझ्यावर सकाळीं एवढे रागावलेत व आतां माझ्या जेवणाची इतकी कळकळ बाळगतां ? एवढी कळकळ बाळगणार माझे दुसर कोण आहे ? असा विचार मनात येऊन रडूं आले." मग बाबा म्हणाले, "जेव जा मला भूकलागली" पुरंदरे म्हणाले, "मी जेवावयला गेलों व मागें ही खोली तुम्ही मोडून टाकली तर इतकी मेहनत घेतल्याचा काय उपयोग ? बाबा काकासाहेबांस म्हणतात, 'मी काय हैवान आहे काय ! काका, आपलें पोर मांडीवर हगले तर मांडी किंवा पोर कापून टाकतात काय ?' मग पुरंदऱ्याकडे पाहून बाबा म्हणाले, 'आता जा,जेवून ये आणि मग काम कर,मी खोली मोडून टाकीत नाहीं जा.' मग पुरंदर जेवावयास घरीं गले. जातांना बाबाच्या पायां पडले, उदी घेतली त्या वेळीं बाबाचे उद्गार निघाले ते, " काका जशी ज्याची नियत तशी त्याला बरकत, हा सर्व अल्ला मियाचा खेळ आहे. "

पुढे पुरंदरे जेऊन परत येऊन बाकीच काम संपवून पालखी खोलींत ठेवल्यावर बाबांच पाया पडले व म्हणाले आपली रजा संपली उद्यां नोकरीवर रुजू होण्यासाठीं निघालें पाहिजे. फक्त कवाड करण्याचें बाकी राहिले आहे, तें आपण करून देऊं असें तात्या पाटील म्हणाले आहेत.

बाबा म्हणाले सकाळचें सकाळीं बघून घेऊं.इतकें झाल्यावर सायंकाळच्या फेरीची वेळ झाली. मंडळी उदी घेऊन बाबांच्याबरोबर फेरीला निघाली.

दुसरे दिवशीं सकाळीं पुरंदरे सामानसुमान बांधून तयार होऊन परवानगीसाठीं मशिदींत गेले. परवानगी मागितली, बरें आहे असे बाबा बोलले व

उदी दिली. पुरंदरे पाया पडले व जावयास लागले. पायरीवरून खालीं उतरणार इतक्यात बाबा म्हणाले, "भाऊ इकडे ये " पुरंदरे माघारे फिरून पुन्हा पाय पडले त्याला बाबा म्हणाले, 'इतकी जावयाची घाई का ?' 'पुरंदरे म्हणाले, माझी रजा संपली व आपण रजाही दिली व कामहीं सपलें म्हणून जातों.' तेव्हां बाबा म्हणाले, दुपारून जा. त्याप्रमाणे जेऊन परत तयारीनिशीं परवानगीला आले, तों बाबा म्हणाले, "जाऊन काय करतोस ते कवाड पुरें कर आणि मग जा. आपण कशाला दुसऱ्यावर टाकावे आपलें काम आपण करावें. वरचेवर जावे वरचेवर यावे " पुरंदरे म्हणाले, "आपण आणाल तेव्हा येऊं, घालवाल तेव्हा जाऊं तें सर्व आपले हातीं. बाबा म्हणाले, "मी तर आणितोंच माणसे कोठे घड आहेत?" आता जा बस. काम पुरे कर व सकाळीं काकडा झाला कीं, आपण जावें. हेंबी काम आपले तेबी काम आपलेच आहे. झाले याप्रमाणे रात्रीची चावडी वगैरे झाल्यावर कवाड पुरे करून दुसरे दिवशीं सकाळीं पुरंदरे पुन्हा रजा घेऊन निघाले. बाबा म्हणाले जा, एकदोन दिवसानीं ये बरें का !

---

## श्री साई गुरुभ्योनमः

शार्दूलविक्रीडितम्

**जिव्हाग्रे सततं प्रणृत्यतु मुदा मे, नाम ते मोक्षदम् ।**
**मद्देहे तव दृष्टिरीश कृपया स्वैरं सदा क्रीडतु ।**
**नित्यं मे हृदि मंगला च परमा मूर्तिश्च ते वर्तताम् ।**
**साई दत्तगुरो शिरस्तव पदे मे सर्वदा लुठ्यतु ॥**

**अर्थः**—हे साई दत्तगुरो, मोक्ष देणारें असें जे तुझें नाम ते माझ्या जिव्हाग्रावर निरंतर आनंदाने नाचूं दे. हे ( साईं ) ईश तुझी दृष्टी कृपेनें माझ्या सर्व शरीरावर नेहमीं मोकळेपणाने खेळूं दे. तुझी परम मंगल मूर्ति माझ्या अंतःकरणांत नित्य वास करूं दे व माझे मस्तक तुझ्या चरणावर अखंड लोळूं दे.

## अनुभव

एकदा कै. रा. रा.नानासाहेब चांदोरकर हे शिरडीस बाबांच्या दर्शनाकरितां गेले. त्या वेळीं दुपारचे बारा वाजून गेले होते. नानासाहेब मशिदींत गेले. त्यानीं बाबांच्या चरणकमलाचें दर्शन घेतले व ते बाबाच्याजवळ बसले. त्या वेळीं नानासाहेबाच्याबरोबर त्याच्या घरची बायका माणसे किंवा इतर पुरुष मंडळी कोणी नव्हती ते एकटेच होते. नित्याप्रमाणे बाबानीं नानासाहेबास कुशल प्रश्न विचारून त्याना बसण्यास सांगितलें. नानासाहेबांनीं त्या प्रश्नाचीं यथोचित उत्तरे दिलीं. नानासाहेबाचें जेवणखाण वगैरे व्हावयाचे होते बाबा म्हणाले नाना, मला आज पुरणाची पोळी खाविशी वाटते. तूं करून आण नानासाहेब म्हणाले, बाबा आता उशीर फार झाला आहे पुरणपोळी करण्यास मजबरोबर घरचीं बायका माणसेही नाहींत व गावांतही या वेळीं कोणी मिळणार नाहीं. मी पोळी उद्या करून आणीन. बाबा म्हणाले, उशीर झाला तरी हरकत नाहीं. पोळी आजच खाविशी वाटते. आताच करून आण. नानासाहेबांस फार पंचाईत पडली. बाबांच्या कानावर सर्व अडचणी घातल्या तरी बाबा पोळी आताच करून आण असा आग्रह धरतात, तरी कसे करावे हा त्याना विचार पडला. बाबांना निक्षून तर नाहीं म्हणवेना. व शिरडीसारख्या चिमुकल्या गावात अशा अवेळीं स्वयंपाक्या ब्राह्मण किंवा पोळी करणारी बाई कोण मिळणार. व बाई किंवा ब्राह्मण कदाचित् मोठ्या कष्टाने मिळाला तर त्यास पुरणाची पोळी चागली करितां आली पाहिजे. एखादा आडमुठ्या ब्राह्मण किंवा आडमुठी बाई मिळून काय उपयोग; पण बाबा ऐकणार कसे? पुन्हा एकवार बाबांना सागून पाहावे असा विचार करून नानासाहेबांनीं त्याच अडचणी पुन्हां बाबाना सांगितल्या, परंतु बाबा आपला हट्ट सोडीनात. नानासाहेबांचा निरुपाय झाला. नानासाहेब म्हणाले बरें, मी गांवात जाऊन पुरणावरणाचा स्वयंपाक करणारी बाई कोणी मिळते किंवा नाहीं त्याचा तपास करून येतों; परंतु जरी कदाचित् बाई मिळाली तरी सर्व सामान बाजारांतून विकत आणून पुरणावरणाचा स्वयंपाक होण्यास २–३ तास तरी लागतील म्हणजे ४ तरी वाजतील. मग अशा अवेळीं आपण ती पोळी खाणार कशी

कशी? बाबा म्हणाले होऊं दे अवेळ मी त्या वेळीं खाईन, पण तूं करून आण. नानासाहेबांची मतीच खुंटली. ते बाबांची आज्ञा घेऊन वाड्यात गेले. ज्या परमात्म्याच्या मनांत आले कीं, जग होऊं दे आणि जग झालें ( God said let there be light and there was light) त्या परमात्म्याच्या मनांत अवेळीं पुरणपोळी खाण्याचे आल्यास नानासाहेबास पुरणपोळी करणारी बाई शिरडी-सारख्या लहानशा गांवात मिळणार नाहीं हे संभवनीय तरी कसें असूं शकेल? वेळ अवेळ, लघु किंवा महत् हा भेद कोणास? त्याचे परमात्म्यास काय? तपास करितांच नानासाहेबांस एक बाई मिळाली. नानासाहेब तिला म्हणाले, बाई या वेळीं बाबाच्या पुरती मला एकच जरी चांगली पुरणाची पोळी करून दिलीस तरी मी तुला एक रुपया देईन; पण या वेळीं कोणतीही सबब सांगून नाहीं म्हणूं नकोस. बाईला आनंद झाला. तिने सर्व पुरणावरणाचा स्वयंपाक सुमारे ४ वाजता तयार करून स्वयंपाक व पोळ्या तयार आहेत असे नानासाहेबांस कळविलें. नानासाहेबाच्याबरोबर काहीं सामान नव्हतें मीठ, तिखटपासून सर्व सामान बाजारातून आणून स्वयंपाक व्हावयाचा २--३ तास हे सहज लागणार. असो, पाकसिद्धी झाल्याचें कळल्यावर नानासाहेबानीं आपले स्नानसंध्यादि विधि आटोपून ते पुरणपोळीचे ताट मशिदीत बाबाकडे घेऊन गेले व बाबांच्या पुढें ताट ठेवून पुरणपोळी व इतर पदार्थ यदृच्छेनें गृहण करण्यास त्यांनीं बाबांस सविनय विनंति केली. बाबा म्हणाले बरे आहे. आतां ते ताट परत घेऊन जा. नानासाहेब म्हणाले, बाबा हे काय? आपण त्या पुरणपोळीस किंवा ताटातील दुसऱ्या एखादे पदार्थांस स्पर्शही न करिता ताट परत घेऊन जा म्हणून सांगतां हें कसे? आपणास खावयाचे नव्हते, तर इतका खटाटोप करावयाला मला आपण कां सांगितलें? आतां आपण या ताटातील पदार्थांपैकीं काहीं तरी ग्रहण केल्यावाचून मी ताट घेऊन परत जाणार नाहीं व मी ही अन्न गृहण करणार नाही. बाबा म्हणाले, नाना मी पोळी खाल्ली. जा आतां ताट घेऊन व तूही जेव. नानासाहेब म्हणाले, आपण पोळी खाल्ली केव्हां? ती तर ताटांत जशी आहे तशीच आहे. आपण पोळी खाल्याशिवाय मी ताट उचलणार नाहीं व मीही अन्न ग्रहण करणार नाहीं. असें म्हणून ताट जागच्या जागीं बाबांच्या पुढें ठेवून नानासाहेब

रागाने तेथून उठून मशिदीजवळच असलेल्या चावडींत चालते झाले व तेथे जाऊन स्वस्थ निजले. अहाहा! काय त्या साईमाऊलीला नानासाहेबाची काळजी! स्वयं-पाक तयार झाला असताना साऱ्या दिवसाचे उपाशीं पोर अन्न ग्रहण न करतां रुसून निघून गेले तर कोणत्या माऊलीचें अंतःकरण तिळतिळ तुटणार नाहीं! नानासाहेबांचा तो प्रेमाचा राग त्याची निस्सीम भक्ति आज्ञेप्रमाणे उत्कट भावनेनें करून आणिलेली ऊन ऊन पुरणपोळी, ह्याची जाणीव त्या साई जगदात्म्याला नव्हती कीं काय! परंतु पोळीचे मिष करून बाबांना नानासाहेबांस एक निराळेंच तत्त्व शिकवावयाचे होतें हे नानासाहेबास तरी काय माहीत? त्या विश्वव्यापकाची कला कोण जाणतो? नानासाहेब रागावून उपाशीच चावडींत जाऊन निजले हें त्या गुरुमाऊलीस बरे वाटेना. तिचे हृदय कळवळूं लागले. तिच्याच्याने स्वस्थ बसवेना. बाबांनीं नानासाहेबास बोलावणे पाठविले गुर्वाज्ञा शिरसावंद्य मानून नानासाहेब मशिदींत गेले. बाबा म्हणाले, नाना मी तुझी पोळी केव्हांच खाल्ली. भलताच हट्ट धरूं नकोस. ताट घेऊन जा व जेव. नानासाहेबांस हें पटेना. ते एकच हेका धरून बसले. आपण यापैकीं थोडें तरी अन्न ग्रहण केल्यावांचून मी ताट घेऊन जाणार नाहीं व जेवणारही नाहीं असे म्हणून नानासाहेब तें ताट तेथे तसेंच टाकून पुन्हां रागानें निघून गेले व चावडींत निजले. काहीं वेळाने बाबांनीं पुन्हा नानासाहेबांस बोलावणे पाठविलें नानासाहेब आले. नानासाहेब आपला हेका सोडीत नाहींत असें पाहून बाबांनीं किंचित् नरसिंहावतार धारण करून म्हटलें, काय नाना माझ्याकडे आज १८ वर्षें येऊन तूं हेंच का शिकलास? माझी पारख अशीच का केलीस? बाबा म्हणजे हा जो साडेतीन हाताचा देह दिसतो आहे तेवढाच का? अरे मी मुंगी होऊन खातों. माशी होऊन खातों. वाटेल ते रूप धारण करून खातों. मी तुझी पोळी केव्हाच खाल्ली आहे. जा आतां विनाकारण दुराग्रह धरूं नकोस. नानासाहेब म्हणाले, बाबा आपण कांहीं म्हटलें तरी माझी समजूत पटत नाहीं. याला मी काय करूं? आपण समजूत पटवा म्हणजे मी ताट घेऊन जाईन व आपला प्रसाद भक्षण करीन. नंतर बाबांनीं नानासाहेबांस कांहीं सांके-तिक खूण सांगितली व म्हटलें कीं, नाना तूं अशी खूण पाहिलीस म्हणजे मी तें

अन्न ग्रहण केलें असे समज. नानासाहेबांच्या अंतःकरणास ही गोष्ट पटली. त्यांना परमानंद झाला. नंतर ते ताट घेऊन वाड्यांत गेले, व गुरुमाऊलीचा प्रसाद म्हणून ते अन्न त्यांनीं परमादराने व परमोत्साहाने भक्षण केले. खरोखरच हा गुरुशिष्याचा संवाद व विसंवाद ऐकून कोणत्या सहृदय भक्तांस व वाचकांस सानंद कौतुक वाटणार नाहीं ? श्री ज्ञानेश्वरींत श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं ठिकठिकाणीं कृष्णार्जुन संवादाचे व विसंवादाचे अशा प्रकारचें वर्णन आपल्या अपूर्व, ओजस्वी व रसाळ वाणीने केलेले आहे. ते वर्णन मी बाबा व ज्ञानेश्वरी या ४० व्या बाबीच्या विवेचनाच्यावेळीं करणार आहे. भक्तशिरोमणी अर्जुन फार वेळ श्रीजगद्गुरु श्रीकृष्ण परमात्मावर रुसले आहेत व जगन्माऊलीने त्यांचें निरनिराळ्या प्रकाराने समाधान केले आहे. असो वरील अनुभव मला नानासाहेबांनीं सांगितला; परंतु दुर्दैवाने म्हणा अगर कोणत्याही अन्य कारणानें म्हणा बाबा मुंगी किंवा माशी होऊन कसे खातात ही खूण मला कळली नाहीं, व मी त्यांना ती मला सांगण्याबद्दल विनंतीही केली नाहीं, कारण माझ्या समजुतीप्रमाणे ह्या गुरुशिष्य खुणा कोणी कोणास अधिकारावाचून सांगत नाहीं. कांहीं हितोपदेशाच्या गोष्टी अगर खुणा बाबा नानासाहेबांकरवीं इतर भक्तांस सांगत व कांहीं स्वतःच सांगत. नानासाहेबांकरवीं सांगितलेल्या गोष्टी कोणी मानीत व कोणी मानीत नसत; परंतु जे मानीत पण बाबा येथे हजर असता ही गोष्ट आम्हांस नानासाहेबांकडून कां कळावी अशी ज्यांना शंका येई तिचे समाधान बाबा पुढेमागे केव्हां तरी स्वतः किंवा अन्य प्रकाराने करीत, असा माझा स्वतःचा अनुभव आहे, व या अनुभवाची आठवण झाली कीं, माझे अंतःकरण आनंदाने, प्रेमाने व सुखाने भरून जाते. असो. इतके मात्र खचित कीं, बाबांचें निरुपमेय प्रेम नानासाहेबांवर असे व नानासाहेबांची अनन्यश्रद्धा बाबांवर असे. बाबांच्या कथा, बाबांचे त्यांना आलेले अनुभव व बाबांच्या इतर बारीकसारीक गोष्टी नानासाहेब सांगूं लागले म्हणजे त्यांचे अंतःकरण भरून येई, त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा गळत व त्यांचा कंठ सद्गदीत होई. बाबांवरील त्यांचें प्रेम निर्व्याज होतें.

नानासाहेबासंबंधाने कित्येक बाबाच्या भक्तांमध्येंच निष्कारण गैरसमज झालेला ऐकिवांत येतो. याबद्दल मी पूर्वींही एकवार श्री साइलीलेच्या एका अंकात बरेच लिहिले होते. देश, ठिकाण, कुल, शील, शरीर स्वभाव व स्थिती हीं प्रत्येक जीवास त्याच्या पूर्व कर्मानुसार प्राप्त होतात, व एकमेकांचे संबंधही पूर्व कर्मानुसार जुळून येतात. व्यवहारात प्रत्येकाचे नानासाहेबांशीं निरनिराळे संबंध असतील, व त्यांचीही वागणूक व्यवहाराला अनुसरून प्रत्येकाशीं निरनिराळ्या तऱ्हेची असेल. ( व ती तशी असणारही ) तथापि हल्ली तरी आपल्यास त्यांच्याकडे ते एक बाबाचे भक्त याच नात्याने पाहावयाचे आहे. त्यांचे अनुभव सत्य, विश्वसनीय मननीय, व आत्मश्लाघाविहीन आहेत. असे मला वाटतें, व म्हणूनच मी ते लिहितो. कोणास ते विश्वसनीय वाटत नसतील तर त्यांनीं खुशाल ते असत्य मानावेत; परंतु त्याची वृथा निंदा करण्याचे व त्याच्यावर आत्मश्लाघेचे आरोप करण्याचें मात्र धाडस करूं नये, येवढीच माझी त्याना नम्र विनंति आहे. ज्याचा त्याचा अनुभव ज्याला त्याला खराच वाटणार, व तो त्याला खरा वाटतो म्हणूनच तो लिहितो. त्यावर विश्वास ठेवणे किंवा न ठेवणे हें प्रत्यकाच्या मनोभूमिकेवर अवलंबून असते. परंतु अमक्याचा अनुभव म्हणजे खरा व तमक्याचा म्हणजे खोटा ही पूर्वग्रह विचारपद्धति दोषार्ह दिसते. दुसऱ्याचा अनुभव आपल्याला न पटल्यास तो आपण मानूं नये किंवा त्यावर आपण विश्वास ठेवूं नये. पण तो खोटा आहे असे म्हणण्याचे पाप मात्र आपण करूं नये असे मला वाटते. मग तो मनुष्य स्त्री असो किंवा पुरुष असो, अशिक्षित असो किंवा सुशिक्षित असो, खेडवळ असो किंवा नगरवासी असो, लेखनकलानभिज्ञ असो किंवा अभिज्ञ असो, त्याचा अनुभव म्हणजे त्याचा अनुभव व तो बाबाच्या संबंधाचा अनुभव. त्यानें तो लिहिला म्हणजे आगंतुक म्हणून लिहिलेला नाहीं. श्री साईलीलेच्या अंकांत श्री साईलीला चालकानीं जाहिर रीतीने व कित्येक वेळा चालकानीं स्वतः प्रत्यक्ष विनंति केल्यावरून त्याने तो लिहिलेला असतो. श्री साईलीला ही भोळ्या भाबड्या भक्तांची माऊली आहे. तिला कृत्रिम नटवेपणा नको आहे. पंडिताचें कुत्सुरीत पांडित्यास किंवा विद्वानांच्या लुसलुसीत विद्वत्तेस बावरण्याचें, द्वे